## नव उदारमतवादी शहरे, आणि त्यांचे दुर्लक्षीत बहूसंख्यांक

एका बाजूला चकाचक श्रीमंतीचे दर्शन तर दुसरीकडे ठायीठायी घडणारे दारिद्र्याचे ओंगळवाणे दर्शन जे झोपडपट्ट्यांच्या स्वरूपात असते, अशी विकसनशील राष्ट्रांतील शहरे म्हणजे नवउदारमतवादाच्या अतिरेकाची उत्तम उदाहरणे आहेत. अत्याधुनिक मुक्ततेचा अतिरेक या शहरांमध्ये झालेला दिसतो जो विविध प्रकारे (अत्याधुनिक इमारती, चकचकीत रस्ते इत्यादी) आपल्या नजरेस पडतो. मुक्त (आर्थिक) धोरणांचा सर्वाधिक नकारात्मक प्रभाव कुठे आढळत असेल तर तो झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या जीवनावर, जेथील बहुसंख्य लोक हे रोजचे जगणे सुसह्य व्हावे यास्तव रात्रंदिवस कष्ट करीत असतात. नव्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे सुखोपभोगाची जी विविध साधने आवाक्यात येत गेली त्यामुळे मध्यम किंवा उच्च आर्थिक वर्गातील लोक – जरी त्यांचे जगणे एकाकी होत गेले आहे, तरी त्या जीवनात समाधानी-आनंदी असलेले दिसतात. या उलट, झोपडपट्टीत राहावे लागणाऱ्या लोकांच्या अस्तित्वाचेच प्रश्न एवढे जटिल झाले आहेत की त्यांना सामूहिकरित्या एकत्र येणे, आपल्या प्रश्नांची तड लावण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे, हे अत्यावश्यक होत आहे. आज ५६% लोक विविध झोपडपट्ट्यांमध्ये विखुरलेले आहेत. मात्र ते मुंबईच्या एकूण जमिनीपैकी फक्त ६% जमिनीवर राहत आहेत (मुंबईचा २००९ सालचा मानव

# आधुनिक नव झोपडपट्ट्या आणि चळवळींमधील

— शालीनी नायर



छायाचित्राचे श्रेय : आशिष धुसेजा

# उदारमतवादी शहरे, शहरी सामाजिक मतभेद

विकास अहवाल) विकसनशील देशातील शहरीकरणाची जी प्रक्रिया घडत आहे ती लक्षात घेता देशाची आर्थिक राजधानी असलेले मुंबई शहर हे त्या प्रक्रियेचे अगदी छोटेसे रूप आहे. येथे वसलेल्या या अनियोजित (इनफॉर्मल) वसाहतींमध्ये 'उखडले गेल्यामुळे झालेला संग्रह' या विरूद्ध चळवळी फोफावण्यास अगदी सुपीक जमीन तयार मिळते. (हार्वे-२००५:१६०)

मात्र या नवउदारमतवादी शहरांची जी नासधूस होत आहे त्यामुळे दोन गोष्टी एकाच वेळी घडताना दिसत आहेत. एकेकाळी मुंबईच्या झोपडपट्ट्या, जेथे अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या, तेथे आता सामाजिक चळवळींचा पूर्ण ऱ्हास होताना दिसत आहे आणि दुसऱ्या बाजूला सामाजिकतेचा विरळ पदर असलेल्या छोट्या छोट्या संस्थांची पिलावळ निर्माण होत आहे.

कास्टेल (१९८३:२९१) हा लेखक असे म्हणतो की सामाजिक चळवळी केव्हा जन्म घेतात - जेव्हा समाजातील विशिष्ट धारणा बाळगणारे लोक एकत्र येऊन त्या धारणा संस्थात्मक स्वरूपात साध्य करू पाहतात, तेव्हा त्याच्या विरूद्ध किंवा त्याला तोंड देण्यासाठी तळागाळातील गट एकत्र येतात. ''त्यातून शहरी रचनात्मक बदल घडताना दिसतात.'' या चळवळींमध्ये विविध उद्देशांचे एकत्रिकरण झालेले आढळते. अशा चळवळींचा एक उद्देश सामूहिक अधिक वाटा मिळवणे हा तर असतोच, त्याचबरोबर सांस्कृतिक अस्तित्व टिकवण्याची ही ती लढाई असते आणि त्यामध्ये राजकीय हक्कांची मागणीही महत्वाची असते. (मेयर, २००६:२०२) नव्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या जमान्यातील (नवउदारमतवादी) ही शहरे एका विशिष्ट पद्धतीच्या रचनेच्या तसेच विविध आर्थिक थरांच्या विळख्यात जखडलेली असतात. त्यामध्ये अल्पकाळात काही आमुलाग्र बदल घडेल असे मानणे म्हणजेच स्वप्नाळूपणा आहे. त्यामुळेच शहरी सामाजिक चळवळींना अनेक पैलू असल्याचे आपल्या लक्षात येते. त्यामध्ये मूलभूत संसाधनांवर हक्क सांगणारे अत्याधिक आग्रही लढे असतात, (पाणी, वीज, शौचालय इ.) अत्यावश्यक सेवांची मागणी करणारे लढे असतात; तसेच सर्व झोपडपट्टीवासियांना एकत्र करून त्यांच्यासाठी 'घरांचा हक्क' मागणाऱ्या चळवळी असतात. त्यात प्रचलित बाजाराचा काही संबंध नसतो. या विविध प्रश्नांच्या लढ्यांच्या आघाड्यांवर मिळालेल्या छोट्या छोट्या यशांमधूनच कालांतराने शहरी रचनेत एक स्थायी स्वरूपाचा, मूलभूत बदल झालेला दिसून येतो.

आधुनिक मुंबई शहराच्या अनेक पदरी रचनेमध्ये शहरवासियांमधील हे परकीयपण अधिकच आणि

# शहर रचनेतील परकीयपणा

अनेक प्रकारे बिंबवले गेले आहे. त्याचे एक कारण असे आहे की १९व्या शतकाच्या मध्य काळात पॅरीसची रचना करणारा वास्तुशिल्पी जी. इ. हॉसमान, आणि त्यानंतर जवळ जवळ १०० वर्षांनी न्यूयॉर्क शहराचा वास्तूरचनाकार मोझेस (१) - त्या दोघांचाही प्रभाव मुंबई शहराच्या आखणीत दिसून येतो. मुंबई शहराला जागतिक शहराचा दर्जा आवश्यक आहे - ''मुंबईचे शांघाय केले पाहिजे' अशी भाषाच नव्हे तर रचनाही सुरू झाली. मुंबईतील उच्चभ्रू अभिजन वर्ग एका बाजूला होऊ लागला, शहरातील उंच मनोरे आणि तेथील सुखसोयी शहरातील अति श्रीमंतांच्या संपत्तीचे प्रदर्शन करू लागले आणि त्याचवेळी शहरातील गरीब मात्र सर्वार्थाने – सामाजिक तसेच भौगोलिक स्थानाच्या दृष्टिने अधिकाधिक दूर फेकला जाऊ लागला. सट्टेबाजीतून

१) हार्वे असे दाखवून देतो की, हॉसमन आणि मोझेस या दोघांच्याही मते अति भांडवलामुळे (भांडवल जास्त झाल्यास) जे प्रश्न निर्माण होतात ते कमी करण्यासाठी नागरी पायाभूत सोयी आणि शहरांमधील जीवनशैली यामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक केली तर असे प्रश्न कमी होतात. परंतु पॅरिसमधील श्रमिक आणि न्यूयॉर्कमधील आफ्रिकन-अमेरिकन यांच्यावर मात्र याचा विपरित परिणाम झाल्याचे दिसून येते. अशामुळे या लोकांची अधिकच कोंडी/पीछेहाट झाल्याचे लक्षात येते.

येणारे भांडवल आणि परदेशी भांडवलदारांची प्रत्यक्ष गुंतवणूक – परिणामी शहरातील जमिनींच्या किंमती भडकल्या. मुंबईतील घराची सरासरी किंमत २ कोटी ६ लाखांच्या वर गेली. मात्र त्याचवेळी मुंबईतील लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न मात्र फक्त १४ लाख एवढेच होते (२०१२ सालातील टाईम्स ऑफ इंडिया व इंडियन एक्सप्रेसच्या अहवालानुसार). शहरी लोकसंख्येतील (गरीब – श्रीमंतांमधील) ही दरी जी वाढत गेली त्या अपयशाचे खापर सर्वस्वी राज्य शासन आणि बाजाराचे प्राबल्य यांच्या माथी आहे (२).

बहुसंख्य लोकांना परवडणारी आणि पुरेशी घरे पुरवण्यात अपयशी ठरल्याने शहरांमधील गरीब वस्त्या नामशेष होत परिघावर फेकल्या गेल्या. खरे पाहता ब्रिटिशांच्या काळात आणि नंतर स्वतंत्र भारतातही – राज्यामध्ये बहुसंख्य मुंबईकरांची घरांची गरज भागविण्याची तरतूद करण्यात आली होती. १९७० आणि ८० च्या दशकाच्या उत्तरार्धात महानगरपालिकेने जागतिक बँकेने पुढे आणलेली 'मदतरूप' होण्याची भूमिका स्वीकारलेली होती. झोपडपट्टी सुधार योजनांचे अंमलीकरण अजूनही पाणी, वीज, शौचालये अशा मूलभूत सोयी पुरवून करण्याचे प्रयत्न चालू होते. याबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था 'परवडणारी घरे' बांधण्याचे काम करीत होत्या. लोकांना शहरातून उखडून टाकण्यावर काही प्रमाणात निर्बंध होते. मध्यमवर्गीय जागरूकतेमुळे तेही झोपडपट्टीवासीयांना उखडून टाकण्यास विरोध करीत होते.

मात्र १९९० च्या सुमारास जागतिक बँकेच्या धोरणांमध्ये पुन्हा बदल करण्यात आला आणि त्याचे परिणाम राज्यांच्या धोरणांवर दिसून आले. गृहबांधणी ही सर्वस्वी बाजार प्रभावी झाली व बिल्डरांच्या मर्जीनुसार गोष्टी घडू लागल्या. तेव्हांपासून सामाजिक बहिष्कार हा अधिकच खोलवर रूजला. त्याला कारणीभूत ठरल्या मुंबईच्या बंद पडत गेलेल्या कापड गिरण्या. बंद गिरण्यांच्या हजारो हेक्टर जमिनीवर उभे राहिले प्रकाश झोतातील गृहसंकुलांचे इमले, व्यापारी संकुले आणि मोठे मोठे वातानुकुलित बाजार. त्यासाठी फेरीवाले, झोपड्या-झोपडपट्यावासिय या सर्वांना मुळातून उखडून टाकणाऱ्या अशा योजना निर्दयपणे राबविण्यात आल्या आणि त्या ठिकाणी सर्व सेवांचे खाजगीकरण करण्यात आले. (बॅनर्जी-गुहा-२००९) 'मुंबईचे शांघाय करणे' हा जणू एक तत्त्वविचार बनविण्यात आला-शासनकर्त्यांनी याचा ज्याप्रकारे गाजावाजा केला – त्याचा उपयोग खाजगी विकासक आणि आंतरराष्ट्रीय निधी पुरवणाऱ्या संस्था यांनी करून घेतला या साऱ्यांनी निर्मिली अशी एक वांच्छित वास्तू जेथे जाण्याचा मोह होतो आणि ती जणू स्वतःला एका स्वप्नवत आदर्श जगात राहण्याचे स्वप्न दाखवते. मध्यमवर्गीयांच्या स्वतःला 'वेगळे' मानण्याच्या मनोवृत्तीला चांगलेच खतपाणी घातले गेले (देशपांडे, १९९५). मुंबई हे जागतिक शहर बनवण्याच्या प्रयत्नात मुंबईचा जणू (गरीब लोकांच्या वस्त्यांच्या रूपातील) एक (विद्रुप) अवयव कापून टाकला गेला आणि परिणामी या शहराला काय बक्षिस मिळाले तर अतिशय ओंगळ (कसल्याही सुविधा नसलेल्या कोंदट-एकमेकांला चिकटून-कंतान-ताडपत्रीच्या साहाय्याने बनवलेली घरे) अशा झोपडपट्ट्या. गरिबांनी राहण्यासाठी ह्या ओंगळवाण्या वस्त्या म्हणजे भव्यदिव्य, अगदी परिपूर्ण असा दर्जा मुंबई शहराला मिळवून देण्याच्या प्रयत्नांमधील मोठाच अडथळा. दोन जगांमधील हा दुरावा आता अगदी ठळक करण्यात आला. नव्या झगमगीत जगात हे झोपडपट्टीत राहणारे दरिद्री लोक, गवंडी-मजूर, घरकाम करणारे लोक आणि रोजंदारीने काम करून जगणारे लोक – हे सारे विखुरलेल्या स्वरूपात आपल्या

२) शहरी पीछेहाट (नागरी प्रदेशात श्रमिकांची होणारी पीछेहाट) हा बाजारी अर्थव्यवस्थेच्या मर्यादा किंवा शासकीय धोरणांच्या मर्यादा याचा परिणाम असतो. वाढत्या संख्येने शहरात येणाऱ्या लोकांना (ज्यांपैकी अनेकजण तर व्यवस्थित नोकरी असणारे पगारी नागरिक असतात) या व्यवस्थेत निवासाची पुरेशी सोय आणि अन्य नागरी सुविधा मिळत नाहीत. जे लोक अर्थव्यवस्थेत अनौचारिक किंवा असंघटित क्षेत्रात काम करणारे असतात – (उत्पन्नाची निश्चिती नसते) ते तर या सुविधांपासून फारच दूर राहतात (कास्टेल्स – १९८४:१८५)

पाणी-रस्ते-शौचालये आदि जीवनावश्यक मागण्यांसाठी अधूनमधून आंदोलने करीत राहतात. मात्र इतरांकडून ‘न त्यांना कोणताही पाठिंबा मिळतो न त्यांच्यात कोणती एकी असते. परिणामी आपापसातल्या मतभेदांमुळे या गरिबांमधेच फूट पडते, पाडली जाते. ही फूट केवळ विविध आर्थिक वर्गातील लोकांमध्येच असते असे नाही, तर वेगवेगळ्या झोपडपट्ट्यातील लोकांमधेही असते. झोपडपट्टी पुनर्वसनाचे धोरण आणि योजनांही सर्व समावेशक नाहीत. कोणताही ठोस आधार नसलेली एक तारीख-वर्ष शासनातर्फे जाहीर केले जाते. त्यापूर्वी बनलेल्या झोपडपट्ट्यांना ‘अधिकृत’ असा दर्जा मिळतो. बाकीच्यांना कोणताही दुसरा पर्याय न देता ‘अनधिकृत’ म्हटले जाते, ते एकीकडून दुसरीकडे फेकले जात राहतात. जेथे जागा दिसेल तिथे ती कुटुंबे पुन्हा आपली कंतान-ताडपत्र्यांची ‘घरे’ उभारतात. अधिकृत रेकॉर्डस् किंवा नोंदणीपत्रात त्यांना कुठेच अस्तित्व नसते. त्यांची कसलीच नोंद नसते. यामुळे होते काय तर संपूर्ण शहर, म्हणजे एक सामूहिक विशिष्ट शासन यंत्रणा जेथे अस्तित्वात आहे असे शहर होण्यास आपोआपच पायबंद बसतो. परिणामी पुरोगामी, सामाजिक चळवळी सुरू होण्याची शक्यता वाढते. (हार्वे – २००८:३३)

‘‘हॉसमन’’ ने असाच एक निर्णय घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी घेतला होता. पॅरीसमधील सर्व झोपडपट्टया त्याला उखडायच्या होत्या-असा मार्ग फक्त भौतीक गोष्टींचाच पारंपारीक विचार करणाऱ्या लोकांचाच असू शकतो. पण ‘उखडण्याचा हा उपाय सतत आणखी नव्या नव्या प्रश्नांना जन्म देतो’ असे मत अँगल्सने हॉसमनच्या या कृतीबद्दल व्यक्त केले. डेव्हिसने ह्याच वर्णनाला आणखी पुढे नेले. आणि त्याने असे म्हटले की विकसनशील देशातील जी मोठीमोठी शहरे आहेत तिथे असे अनेक ‘हॉसमन’ असतात. त्यांना कोणताही भल्या-बुऱ्या मार्गाचे वावडे नसते. त्यांच्या ‘विकास करणाऱ्या कंपन्यांना’ जागतिक बँकेचे कर्ज उपलब्ध असते. कसल्याही नियमांची भीड-भाड न बाळगता हे लोक काम करतात. (डेव्हिस १९९९) मुंबई शहरातही याचा प्रत्यय येतो. मुंबई महानगर प्रभाग विकास प्राधिकरण (MMRDA) किंवा मुंबई विकास सहयोग विभाग (MTSU) आहेत-त्यांच्या मार्फत पायाभूत सोयींच्या प्रकल्पांचे नियोजन केले जाते-त्यांची अंमलबजावणी केली जाते. त्यांच्या पूर्ततेसाठी ते खासगी विकासकांशी भागीदारी करतात. आंतरराष्ट्रीय संस्थांकडून निधी मिळवतात. मात्र या संस्था देखील शहरी गरिबांकडे पूर्ण दुर्लक्ष करतात, त्यांचे अधिकार नाकारतात आणि बाजाराच्या प्रभावाखाली बाजाराला पूरक संधी निर्माण करीत राहातात.

# शहरी प्रदेशांच्या समतोलाला छेद देण्यात नव्या उदारमतवादी धोरणांचा प्रभाव

ब्रिटिशांच्या काळात शहरी गरीब आपपल्या प्रश्नांवर एकत्र येत असत आणि प्रश्नांची तड लावीत असत. त्यांच्या प्रश्नांची सर्वांनाच (सर्व समाजाला) समज असे. त्या काळात मुंबईत बांधल्या गेलेल्या बीडीडी (BDD) चाळी हे त्याचे उत्तम उदाहरण. त्या चाळीतच दलित चळवळ रूजली-वाढली. गिरणगावात जेथे अधिकाधिक कापड गिरण्यांचे कामगार राहात असत तेथेच कामगार चळवळींचे बीज रोवले गेले. मात्र नव्या मुक्त अर्थव्यवस्थेत हे सर्वच बदलले. या व्यवस्थेने सर्वसामान्य लोकांनी एकत्रित होऊन आपल्या प्रश्नांवर तोडगा शोधण्याच्या संकल्पनेवरच घाव घातला. त्यासाठी ‘अनधिकृत’ किंवा ‘अयोग्य-लायक नाही’ अशा शब्दांचा आधार घेतला गेला. एकदा शिक्का मारला की पुढील गोष्टींचा पुरवठा बंद करणे आणि हळू

हळू तेथील रहिवाशांना त्या जागेतून घालवणे अशी ही प्रक्रिया. डेव्हिस म्हणतो त्याप्रमाणे ज्या झोपडपट्ट्या 'अधिकृत' किंवा 'योग्य' असतात (त्यांना एकटे पाडणे सुरू होते) - येथे डेव्हिस मॅक्सिको शहरातील वसाहतींचे उदाहरण देतो. तो म्हणतो लोकांच्या एकत्रित होण्याला प्रतिबंध केला जातो. त्यांच्या एकीला दुय्यम महत्त्व देणे – घराचा प्रश्न हा एकेकट्याचा आहे हे अधोरेखित करणे, आणि एकेकट्याला त्यांच्या नावावर घर करून देणे ज्या योगे ते अन्य रहिवाश्यांपासून वेगळे पडू लागतात (डेव्हिस-२००७) धारावी हे त्याचे एक उत्तम उदाहरण. धारावीचा पुनर्विकास हा प्रदिर्घ काळ चर्चेत असलेला प्रकल्प. तेथे खाजगी विकासकांनी धारावीतील रहिवाश्यांना उंच उंच इमारतींमध्ये हलवले. दोन चौ. किमीचा झोपडपट्टी असलेला पट्टा त्यासाठ़ी वापरला. स्वतः चढ्या क्रमाने नफा मिळवीत राहिले. पात्रता सिद्ध करण्याचे जे नियम बनविले गेले त्यामुळे पात्र आणि अपात्र यांच्यामध्ये घरांच्या हक्कांसाठी भांडणे मारामाऱ्या सुरू झाल्या. भाड्याच्या झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांनी त्यांच्या त्या घरांवरील मालकी हक्कांसाठी भांडणे केली आणि अगदी ओंगळ झोपड्यात राहून, तेथेच स्वतःचा छोटासा उद्योग धंदा करून पोट भरणाऱ्या लोकांनी मोठी घरे, त्यांच्या उद्योगांसाठी जागा, अशा मागण्या पुढे केल्या. 'विकास' होणार असेल तर सर्वांचीच स्वप्ने तयार होती. 'धारावी बचाव आंदोलन समिती' सारख्या किंचित डाव्या विचारांकडे झुकलेल्या संघटनेने स्थानिक महानगर पालिकेच्या निवडणुकात याच मुद्यांवर भर देत भाग घेतला. कारण या बाजारी विकासाला त्यांचा पूर्ण विरोध होता. परिणामी अशा विषम-परस्पर विरोधी मागण्या; असलेल्या लोकांचा गट एकसंध न होता, उलट त्यांनी सामाजिक चळवळींच्या स्वरूपात एकत्र येण्यात अडसरच निर्माण झाले. अशीच परिस्थिती मेक्सिको शहरातील मॉंटेरी स्कॉटर चळवळीत (बेघरांनी मोकळ्या इमारतींचा ताबा घेण्याची चळवळ) अनुभवायला मिळाली होती. तेथे या झोपडपट्टीवासियांनी त्यांची (काही) घरे कायदेशिरपणे स्वतःची करून घेण्याची प्रक्रिया नाकारली होती आणि उलटपक्षी सर्वांनी एकत्र येऊन मुलांसाठी शाळा, आरोग्य केंद्र, वसाहतींमध्ये नागरी केंद्र अशा गोष्टी सुरू केल्या. त्या लोकांना अशी साधार भीती वाटत होती की "कायदेशिरपणाच्या" प्रक्रियेतून काय निष्पन्न होईल तर फक्त आयुष्य व्यर्थ घालवणाऱ्या लढाया;-खटले-कोर्टकचेऱ्या. (कॅस्टेल्स १९८३:२१२)

झोपडपट्टीत राहणाऱ्या वसाहतींमध्ये काही लोकांनाच "नियमित" करण्याचे काय परिणाम होतात तर येथे राहणाऱ्या लोकंमध्ये फूट पडू लागते – गटबाजी निर्माण होते. "नियमित" होणाऱ्या काही जणांमध्ये आपण आता "खास वर्ग" झाल्याची भावना बळावते तर उरलेल्यांमध्ये – जे आधीच स्थलांतरीत असतात व जात, भाषा, विविध राजकीय पक्षाबरोबरची जवळीक इत्यादि गोष्टींमुळे विभागलेलेच असतात ते सारे मात्र ग्राहक वर्गात ढकलेले जातात. अशांचे वास्तव्य असलेल्या या झोपडपट्ट्या म्हणजे जणू एक नियंत्रित प्रयोगशाळाच असते. तेथे सुरू असतात तोडफोडीचे, लोकानुययी, मतदार संघ तयार करण्याचे राजकारण. त्याचा आणखी एक परिणाम असाही दिसून येतो की जणू झोपडपट्टीत राहणारे हे सारे लोक म्हणजे देशाचे नागरिक नव्हतेच. कारण नागरिकांना 'हक्क' असतात; "सार्वभौमिकता" असते. हे सारे लोक म्हणजे "लोकसंख्येचा एक असा भाग ज्यांच्यावर राज्य करण्याची गरज असते आणि अधूनमधून त्यांना काही राजकीय लाभ मिळवून द्यावे लागतात – हा एक आश्रयदाता आणि ग्राहक अशा स्वरूपाच्या नात्याचा भाग असतो. (चॅटर्जी, २००४); परिणामी या ग्राहकवर्ग तयार करण्याच्या सापळ्यात सापडून सामाजिक एकात्मिकरण होत जाते पण त्यामुळे सामाजिक परिवर्तन घडवू शकणाऱ्या नागरी सामाजिक चळवळी मात्र विझत जातात. (Castelis – १९८३)

# धीम्यागतीने प्रगती

एका बाजूने या नवमुक्तअर्थवादी राज्यांमधे सामूहिक, सामाजिक चळवळींना सतत सुरूंग लावला जात असतो. परिणामी या झोपडपट्टीवासियांच्या हातात प्रतिकाराचा एकमेव मार्ग शिल्लक राहातो तो फक्त 'शांतपणे अतिक्रमण' करीत राहण्याचा. (Bayat २०००) बायट यांचे वर्णन करतांना असे म्हणतो की ही संघटित कृती नसते पण शहरी गरीब वर्ग हा आपल्या 'निवारा', 'रोजगार' आणि किमान नागरी सुविधा' मिळवण्यासाठी या बेकायदेशीर, अनौपचारिक आणि अ-संस्थात्मक उपायांचा वापर करीत असतो. 'गरीब लोक सत्ताहीन असतात' या कल्पनेला धक्का जातो तो बायट कडून, फाऊक्टच्या "सत्तेचे सार्वत्रिक अधिराज्य" या संकल्पनेला तो पुढे नेतो व गरीब हा दुर्बळ असतो या संकल्पनेला तडा देतो. ही गोष्ट खरी आहे की गरीबांचे निषेध मोर्चे हे मुख्यतः त्यांच्या प्रश्नांची तड लावून घेण्यासाठी असतात तसेच त्यांच्यामधे तोडफोड करण्याची संघटित ताकद फारशी नसते. कामगारवर्ग किंवा विद्यार्थीवर्ग हा सामाजिक चळवळीत अधिक पोटतिडीकेने उतरतो आणि अन्यायाची तड लावण्याचा आटोकाट प्रयत्न करतो.

एका गरजेपोटी जरी अशी कृती (या गरीब) लोकांकडून घडत असली तरी (दुर्दैवाने) कालौघात त्याचे काही वेगळे परिणाम (जे कृती घडतांना अजिबात कोणाच्या विचारात नसतात) घडलेले अनुभवायला मिळतात. उदा. जमिनीचे फेर वाटप, संसाधनांचे पुनर्वाटप आणि राज्य शासनाने लादलेल्या नियमांमधून – संस्थामधून मोकळीक. (बायट-२०००) मुंबईमध्ये एखाद्या कुत्र्याच्या छत्र्यांसारख्या झोपडपट्ट्या उगवल्या आहेत – टेकड्यांचे उतार, खाडीचा भाग, पदपथ जेथे जेथे सार्वजनिक जागा उपलब्ध असतील तेथे तेथे लोकांनी झोपड्या बांधल्या. मुंबईच्या दैनंदिन जीवनपद्धतीचा त्या भाग बनत गेल्या. महानगरपालिकेच्या स्त्रोतांमधूनच त्यांना पाण्याची आणि वीजेची चोरी करावी लागते. त्यांच्या अनधिकृत घरांची लांबी रूंदी वाढत राहाते कारण त्यांच्या वाढत्या कुटुंबाना सामावून घेण्याची गरज निर्माण होते. स्वाभाविकच त्यांची रोजीरोटी ते असलेला छोटा मोठा व्यापार ते रस्ते-पदपथ या ठिकाणी अनधिकृतपणे करीत राहातात आणि पैसे कमावतात. त्यांच्या झोपड्या असलेल्या जागेवर डोळा असतो खाजगी विकासकांचा – एक अतिशय क्रूर लढाई या दोन असमान गटांमधे चालू असते. कारण त्यांना ह्या जागांवरून हटविण्याचे निर्दय प्रयत्न हे विकासक करीत असतात. एकतर त्यांचे विस्थापन केले जाते किंवा त्यांना एखाद्या सरकारी योजनेत सामावण्याचा प्रयत्न केला जातो. या ''अनौपचारिक (अनधिकृत) वस्त्या निर्माण होण्याचे मुख्य कारण आहे ते शहरी गरिबांच्या विरोधातील आणि अत्यंत कठोर असे कायदे व नियम'' (भौमिक व इतर -२०११) मात्र याचा एक असा परिणाम दिसतो जणू या नागरी नवउदारमतवादी अर्थव्यवस्था मानणाऱ्यांच्या विरोधात आता शहरातील गरिबांकडे नेतृत्व जात आहे किंवा त्यांचे विद्यमान नेतृत्वावरील नियंत्रण वाढत आहे. खरे पहाता शहरांमध्ये परवडू शकतील अशा घरांची वानवा इतकी विदारक आहे की त्यामुळे लोकांना नाईलाजास्तव झोपडीत राहावे लागते. स्वाभाविकपणे जे शहर त्यांना त्याचे निवासाचे अधिकार नाकारते त्यांच्या विरोधात उभे राहून या शहरावरील स्वतःचा हक्क मागण्यासाठी पुनर्स्थापित करण्यासाठी त्यांना आंदोलनाशिवाय पर्याय नसतो. काही ठिकाणी तर असे दिसून आले आहे की एरवीचे श्रीमंत-गरीब भेद विसरून गरीब-मध्यम वर्गातील लोक एकत्र येऊन त्यांच्या हक्कांची लढाई लढत आहेत. उदा. जागतिक बँक आणि मुंबई महानगरपालिका यांनी एकत्र येऊन मुंबईच्या पाणी पुरवठा व्यवस्थेचे काही प्रमाणात खाजगीकरण करण्याचा घाट घातला होता. मात्र शहरातील विविध संस्था-संघटनांचे कार्यकर्ते एकत्र आले. या खाजगीकरणाविरूध्द त्यांनी मोठे

आंदोलन उभारले. पाणी – आणि अन्य जिवनावश्यक गोष्टींचे खाजगीकरण करण्याला त्यांनी विरोध केला. नाहीतर खाजगी संस्थांनी या सेवांसाठी गरीबांकडून वाढलेल्या दराने पैसे वसूल केले असते. आज ते मोठे बेकायदेशीरपणे पाणी मिळवत असतील पण ती व्यवस्थाही बंद केली जाईल अशी भीती त्यांच्या मनात होती.

# रोजी रोटी देणाऱ्या शहरापासून तुटत जाणे

'मंडाळा' ही एक २००० सालापासून उभी राहत गेलेली मोठी झोपडपट्टी. मुंबई शहराच्या परीघावरील खारफुटीच्या जागेत भराव टाकत, त्या जागेवर शांतपणे अतिक्रमण करीत, चिकाटीने तेथेच वस्ती वाढवत जाऊन तयार झालेली ही एक 'आदर्श' झोपडपट्टी. येथे वसलेले लोक हे आपली गावाकडची मुळे कापून टाकून पोटापाण्यासाठी मुंबईत आलेत. मात्र येथे त्यांना जागेअभावी अशा ओंगळवाण्या गिचमिड वस्तीत राहावे लागते. डिसेंबर, २००४ मध्ये मंडाळा आणि त्यासारख्या अन्य २५ झोपडपट्ट्यांवर 'मुंबईच्या सुशोभिकरणाच्या' नावाखाली एक मोठी कुऱ्हाड चालवण्यात आली. सुमारे ९०,००० झोपड्या नेस्तनाबूद करण्यात आल्या. मुंबईतील नागरिकांना मोकळा श्वास घेण्यासाठी मैदाने- खुल्या जागा आवश्यक आहेत असे समर्थन करण्यात आले. सुमारे ६ महिन्यांनंतर श्री. मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली "नॅशनल अलायन्स ऑफ पीपल्स मुव्हमेंट" या संघटनेशी संलग्न असे 'घर बचाओ – घर बनाओ' हे मोठे आंदोलन उभे राहिले ज्यामध्ये या तोडण्यात आलेल्या ९०,००० झोपड्यामधील रहिवासी सामील झाले. या आंदोलनातून स्फूर्ती घेऊन मंडाळामधील सुमारे ३००० कुटुंबांनी आपली तोडलेली घरे पुन्हा उभारण्यास सुरूवात केली. त्या अवशेषांमधून पुन्हा एकदा आपले जगण्याचे साधन निर्माण करीत जगायला सुरवात केली. परंतु वर्षभरातच पुन्हा त्यांची घरे नामशेष करण्यात आली. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने २००६ साली या झोपड्या तोडण्याच्या संदर्भात अभ्यास करून एक अहवाल प्रसिद्ध केला. त्या अहवालात स्पष्टपणे म्हटले होते की दुसऱ्यांदा घरे पाडली तेव्हा प्रचंड प्रमाणात हिंसाचार करण्यात आला आणि पूर्वीप्रमाणे लोकांनी जुने सामान पुन्हा झोपड्या वापरू नये म्हणून संपूर्ण वस्तीलाच मुद्दाम आग लावण्यात आली होती. स्वाभाविकच या बेघरांनी आपले आंदोलन अधिक तीव्र केले. माणसे न घाबरता बुलडोझरपुढे आडवी पडली. लाठीमार सहन केला – स्त्रिया आपल्या मुलाबाळांसह आघाडीवर होत्या. किंबहुना या सर्व आंदोलनांमध्ये स्त्रियांचा मोठा सहभाग होता. मंडळातील सर्व लोकांनी– ज्यांची घरे पूर्णपणे नष्ट झाली होती – आंदोलनाचा पुढचा टप्पा आझाद मैदानात (जन चळवळींसाठी शासनाने उपलब्ध केलेले एक मैदान) ठिय्या आंदोलनाच्या स्वरूपात सुरू राहिला. मात्र मुंबई उच्च न्यायालयाने या झोपड्या उठविण्याच्या कारवाईला कायदेशीर मान्यता दिली. परिणामी १०० निदर्शकांना तुरूंगात टाकण्यात आले – त्यांच्या तात्पुरत्या उभारलेल्या झोपड्या पुन्हा पाडण्यात आल्या. (सिंग - २०११)

आज तेथे काय चित्र दिसते आहे! (तोडफोड करून – आगी लावून) जी जागा मोकळी करण्यात आली आहे त्याच्या कडेकडेने लोकांनी पुन्हा अगदी तात्पुरत्या झोपड्या उभारल्या आहेत. शेजारीच १९९५ पूर्वी वसलेली मान्यताप्राप्त झोपडपट्टी आहे – तेथे काही लोकांनी झोपड्या भाड्याने घेतल्या आहेत. २००७ साली मंडळांच्या लोकांनी पुन्हा एक कठोर निर्णय घेतला. राजकारण्यांच्या मेहेरबानीवर न जगता त्यांनी कायदेशीर मार्गांचा अवलंब करण्याचे ठरविले. शहरावरील त्यांच्या हक्कांची मागणी त्यांनी केली.

अतिक्रमण हटविल्यामुळे ४५ एकर जागा रिकामी केली गेली होती. त्यापैकी त्यांनी त्यांची घरे बांधण्यासाठी 'राजीव आवास योजनेचा' आधार घेतला (जी योजना या आंदोलनामुळेच शासनाने मुंबई शहरात लागू करण्याचे कबूल केले होते) स्वतःची घरे स्वतः बांधण्याचा निर्णय घेतला गेला. ही योजना अंमलात आणली तर तो मुंबईतील पहिला झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प ठरेल. येथे विकासक नव्हे तर झोपडीत राहणारे लोकच स्वतःची घरे बांधतील. बाजारातील प्रचंड दबाव आणि ताकद याला हे एक प्रभावी उत्तर आहे. त्यामुळे शहरातील मोकळी मैदाने मोकळीच राहतील, जी एरवी खासगी विकासकांना दिली जातात. खरेतर शहरातील गरिबांना परवडणारी घरे देणे हे काही अशक्य नाही. यामधे कोणती तरी एक तारीख जाहीर करून अधिकृत-अनिधकृतच्या जाळ्यात सापडण्याची गरज नाही. एखाद्या झोपडपट्टीत कोण किती काळ राहात आहे यावर खल न करता प्रत्येकाला घराचा हक्क मिळेल. गेली ६ वर्ष हा प्रस्ताव नोकरशाहीच्या तडाख्यात सापडून इकडून तिकडे फिरतो आहे आणि आंदोलनकर्त्यांचा धीर आता खचत चालला आहे. पोलीस आणि अन्य अधिकाऱ्यांना लांच देऊन पुन्हा मोकळ्या जागेवर अतिक्रमण करून तेथेच राहायला हवे की काय असा विचार ते सर्व करीत आहेत.

एक मात्र खरे की स्वतःची घरे बांधण्याची त्यांची ही तीव्र इच्छा ही एका अर्थाने त्या सर्वांची या नव्या उदारमतवादी व्यवस्थेतील शहरांपासून – ज्या शहरांनी त्यांना दुबळे बनवले, अमानवी जगणे भाग पाडले, त्या शहरांवरील अवलंबित्व कमी करण्याचाच एक भाग आहे. खूपदा असे घडू शकते की जरी त्यांच्या मागण्या नेमकेपणे मांडू शकणारे नेतृत्व त्यांच्याकडे नसले तरी ते सर्व संघटित होतात. "अधिकृततेच्या" भोंगळ कसोट्या लावून बनवलेल्या (पोकळ) योजना ते धुडकवतात किंवा बाजारधार्जिणी पुनर्वसनाची (उंच मनोऱ्यांची वैगेरे) कल्पना त्यांना मान्य नसते. ते नव्या कल्पना लढविताना. शहरी नूतनीकरणाच्या पर्यायी कल्पना पुढे आणतात. जागतिक शहरांमध्ये अनुस्युत अश्रेष्ठ परीस्थीती स्वीकारून ते गप्प बसत नाहीत. शहराच्या भूगोलावरून त्यांना दिसेनासे करण्याची कोणतीही संकल्पना त्यांना मान्य नसते, तर उलटपक्षी शहर-विकासाच्या धोरणांमध्ये त्याची जागा अधोरेखित करण्याचे त्यांचे प्रयत्न असतात. हार्वे (१९९५:४२०) म्हणतो त्याप्रमाणे शहरे ही केवळ व्यक्तिकेंद्रीत न राहता त्यातील (सामूहिकतेच्या) विविध शक्यता ते पुनर्लेखित करू पाहतात. जागतिक नागरीकरणाच्या प्रक्रियेत हे (गरीब) लोक स्वतःचे स्थान पक्के करू पाहतात. त्याचा परिणाम दिसो अथवा न दिसो – पण एक गोष्ट नक्की की अशा नवउदारवादी शहरांमध्ये जी शहरे बहुसंख्य गरिबांना उपेक्षित ठेवतात – अशी आंदोलने – असे लढे जे लोक दीर्घकाळ लढत राहतात ही सुद्धा एक त्यांच्या विजयाची खूणच असते.

# संदर्भ

१) बॅनर्जी – गुहा (२००९) "निओ लिबरलायझिंग द अर्बन" "न्यू जिओग्राफिज अँन्ड इनजस्टीस इन इंडियन सीटीज". इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकली, व्हॉल्यूम नंबर ४४, नंबर २२, (मे ३०- जून ५,२००९) पृ. ९५ ते १०७.
२) बायट, असिफ (२०००) डेंजरस क्लासेस 'टू क्वाऐट रिबेल्स: पोलिटिक्स ऑफ द अर्बन सबर्लटन (Subaltern) इन द ग्लोबल साउथ" इंटरनॅशनल सोशिओलोजी. १५(३)२००० मधून.
३) भौमिक, शरिफ, आणि झेराह, मारी हेलन अॅन्ड चौधरी, वासुदेव(२०११) अर्बन लाइवलीहुडस: "द सिटी वर्सेस द इन्फोर्मल इकॉनॉमी" इन झेराह, मारी– हेलेन अॅन्ड ड्युपॉन्ट, व्हेरॉनिक आणि लामा-रिवाल, स्टिफनी तावा (संपा.) अर्बन पॉलिसीज अॅन्ड द राईट टू द सिटी इन 'इंडिया', (युनेस्को हाऊस, नवी दिल्ली, नोव्हेंबर २०११)
४) कास्टेल्स, मन्युएल(१९८४) 'अ क्रॉस कल्चरल थिअरी ऑफ अर्बन सोशल चेंजेस' अॅन्ड 'द सोशल बेसिस फॉर अर्बन पॉप्युलिझम : स्क्वाटर्स अॅन्ड द स्टेट इन लाटिन अमेरिका' इन द सिटी अॅन्ड द ग्रास रूटस (युनिवर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस, बर्कली) पृ. २०२–२०६
५) चटर्जी, पार्थ (२००४) 'द पोलिटिक्स ऑफ द गव्हर्नड' रिफ्लेक्शन्स ऑन पॉप्युलर पोलिटिक्स इन मोस्ट ऑफ द बर्ल्ड' (कोलंबिया युनिवर्सिटी प्रेस, न्यूयॉर्क.
६) डेविस, माइक (२००७) प्लानेट ऑफ स्लम्स (वरसो, २००७)
७) देशपांडे, सतीश (१९९५) कम्युनलायझिंग द नेशन – स्पेस : नोट्स ऑन स्पाशिअल स्ट्रॅटेजिज ऑफ हिंदुत्व' इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकली, व्होल्युम ३०, नंबर ५०, (डिसेंबर १६,१९९५) पृ. ३२२०-३२२७.
८) एंगल्स, एफ (१८७२) वर्क्स ऑफ फ्रेडरिक एंगल्स : द हाऊसिंग क्वेश्चन (रीप्रिंटेड बाय द को-ओपरेटीव्ह पब्लिशिंग सोसायटी ऑफ फोरिन वर्कर्स, ट्रान्सक्राइब्ड झोडिअॅक, जून १९९५ (htpp//www.maxists.org/archive/marx/works/१८७२)
९) हार्वे-डेविड (१९९५) 'पॉसिबल अर्बन फ्युचर्स' इन हार्वे, जस्टीस, नेचर, अन्ड द जिओग्राफी ऑफ डिफरन्स (लंडन, ब्लॅकवेल, १९९५)
१०) हार्वे-डेविड (२००५) अ ब्रीफ हिस्टरी ऑफ निओलिबरालीझम (ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, न्यूयॉर्क), ५३, सप्टेंबर-ऑक्टोबर २००८, http//newleftreview.org/ll/५३/ डेविड-हार्वे-द-राईट-टू-द-सिटी
११) हार्वे–डेविड (२००८) द राइट टू द सिटी, न्यू लेफ्ट रिव्ह्यू
१२) मेयर, मार्गिट (२००६) 'मन्युअल कास्टेल्स' द सिटी अन्ड द ग्रासरूट्स' इंटर नॅशनल जर्नल ऑफ अर्बन अॅन्ड रिजनल रिसर्च, व्होल्युम ३०, १(मार्च २००६)
१३) मुंबई ह्युमन डेव्हलमेंट इंडेक्स (२००९) स्लम्स : द फेस ऑफ इनइक्विटी (म्युनिसिपल कार्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई, ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, न्यू दिल्ली)
१४) सिंग सिम्प्रित (२०११) मंडाळा, घर बचाओ, घर बनाओ आंदोलन, जून २०११, http/essays.pad.ma/mandala
१५) द इंडिअन एक्सप्रेस (एप्रिल २०१२) अवरेज कोस्ट ऑफ मुंबई फ्लाट इज रूपीज२.६ करोड http/www.indianexpress.com/news/average-costof–mumbai-flat-isrs-2.6cr/९४११९८
१६) द टाईम्स ऑफ इंडिया (मार्च २०१२) मुंबईकर्स अर्न मोअर दॅन दिल्ली रेसिडंट्स http://articles.timesofindia.indiatimes.com/2012-03/Mumbai/31229722_1_caita-income-services-sector-realityprices
१७) टी आयएसएस (२००६) रिपोर्ट ऑफ अ रापिड इन्क्वायरी इन टू द डिमोलिशन अॅन्ड फायर ओंन द नाइन्थ मे २००६ अट इंदिरा नगर अॅन्ड, जनता नगर इन मंडाळा, मानखुर्द, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस. मुंबई २००६